पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/०४/कावि/७७/२०२२
दिनांक- २४/०२/२०२२

प्रति,
मा......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११०१८.


विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दि.**०४/०३/२०२२** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा शुक्रवार, दिनांक **०४/०३/२०२२** रोजी **दु. ३.००** वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. मा.सभापती, विधी समिती या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनातून सभा संचलित करणार आहेत. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

**मा.विधी समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक- ०८**

**दिनांक : ०४/०३/२०२२** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा शुक्रवार, दिनांक **०४/०३/२०२२** रोजी **दु.३.००** वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. मा.सभापती, विधी समिती या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनातून सभा संचलित करणार आहेत. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) मा.विधी समितीची सभा (कार्यपत्रिका क्रमांक **०७**) दिनांक १८/०२/२०२२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) "पवना धरणातून से.क्र.२३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणे साठी थेट पाईप लाईन टाकणे" या कामाचा आदेश ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांना दि. ३०/०४/२००८ रोजी देणेत आला असून कामाची मूळ मुदत २४ महिने म्हणजेच दि.२८/०४/२०१० पर्यंत होती. सदर काम चालु असतानाच्या दरम्यान दि.०९/०८/२०११ रोजी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बऊर टोलनाका येथे या प्रकल्पा विरोधात झालेल्या रस्ता रोको आंदोलन प्रसंगी झालेल्या पोलिस गोळीबारात ३ शेतक-यांचा मृत्यु झाला आहे. त्याअनुषंगाने दि.१०/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये मा.जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी "जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित ठेवण्यासाठी वरिष्ठ पातळीवर सदर योजनेबाबत बैठक होईपर्यंत पवना धरणातून बंद पाईप लाईन द्वारे पाणीपुरवठा योजनेचे काम तूर्त थांबविणेत यावे" अशी विनंती केली होती. त्याअनुषंगाने सदरचे काम दि.१०/०८/२०११ पासून आजतागायत बंद आहे. आतापर्यंत सदरचे काम १२.६२ % एवढे पुर्ण झाले असून मुदतवाढ दि.३१/१२/२०२१ पर्यंत घेणेत आलेली आहे. काम चालु असतानाच्या

काळात ठेकेदाराने १८०० मि.मी. व्यासाचे, १२ मी. लांबीचे, १० व १२ मि.मी जाडीचे एकूण लोखंडी पाईप २१६९ नग आणि पाईप जोडणीसाठी ५८.१७ मी. लांबीचे Special आणून ठेवलेले आहेत. सदरचे लोखंडी पाईप एकूण २६.६० एकर एवढ्या क्षेत्रामध्ये ठेवलेले आहेत. या व्यतिरिक्त ४५ x १५ मीटर च्या बंदिस्त गोडाऊन मध्ये पाणीपुरवठा विषयक २४४ व्हॉल्वस, ६ पंप्स तसेच १२ विद्युत मोटर्स, विद्युत संबंधित ५० व्हॉल्वस, ३२ ट्रान्सफार्मर व इतर विद्युत जोडणी साहित्य ठेवलेले आहे. सदरच्या साहित्याचे संरक्षण करणेसाठी ठेकेदाराने कामाच्या आदेशापासून आजतागायत सुरक्षा कर्मचारी नेमलेले आहेत. साईटवरील लोखंडी पाईप आणि बंदिस्त गोडाऊन मधील मेटेरियल इ. सर्व बाबी ८ ठिकाणी ठेवणेत आलेले आहे. त्यापैकी चार जागा वडगाव मावळ येथील मुंढावरे, साते या ठिकाणी असुन त्यांचे एकूण क्षेत्रफळ २६.६० एकर एवढे आहे. उर्वरित साहित्य मनपा / शासनाच्या रस्त्याच्या कडेला आहेत. ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांचे दि.२५/०३/२०१९ रोजीचे पत्र क्र. PCMC/PAWANA/18-19/MARCH/04 द्वारे निविदा समाप्तीची (Termination notice) सुचना दिली आहे. आता पर्यंत ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांचेकडील सुरक्षा रक्षकांची एजन्सी मे.मॉर्डन सिक्युरटी सर्व्हिसेस हे प्रकल्पामध्ये पुरविणेत आलेल्या सर्व साहित्यांची सांभाळ्याची जबाबदारी घेत होते. परंतु मे. मॉर्डन सिक्युरटी सर्व्हिसेस यांना ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) देयक देत नसल्याने त्यांनी १४/०१/२०२२ रोजी या विभागास पत्र दिले आहे सदर पत्रात त्यांनी दि.०१/०२/२०२२ पासून देयक मिळत नसल्याने सुरक्षारक्षक साईटवर ठेवणार नाही असे नमुद केले आहे. तरी दि.०१/०२/२०२२ पासुन मनपा कडून मे. मॉर्डन सिक्युरटी सर्व्हिसेस यांना देयक द्यावे लागणार आहे. ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांनी या विभागास मागील कालावधीतील मे.मॉर्डन सिक्युरटी सर्व्हिसेस यांच्या बरोबर केलेल्या कामाच्या आदेशाच्या प्रती दिलेल्या आहेत. सदर आदेशाच्या प्रती नुसार प्रति माह र.रु.२,९४,०००/- एवढा खर्च येत आहे. तरी त्या प्रमाणे खर्च देणेस हरकत वाटत नाही असे या विभागाचे मत आहे. सद्यस्थितीत जलशुध्दीकरण केंद्र निगडी पाणीपुरवठा विभाग यांच्याकडे "Augmentation and capacity enhancement of the existing water treatment plant at Sec-23 Nigdi Including Operation and Maintenance for two years and carrying out all necessary allied works (civil, electromechanical instrumentation etc. Complete.) (Tender no- 16/1/2020-21) या आशयाचे काम चालु आहे. सदर कामाचे ठेकेदार मे.एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हे आहे. सद्यस्थितीत या विभागाकडे सिक्युरटी सर्व्हिसेसचे काम उपलब्ध नाही त्यामुळे तुर्तास मे. एस.एम.सी

इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि यांचे कामात नवीन सिक्युरटी सर्व्हिसेसचे निविदा आदेश येईपर्यंत कामाचे देयक देणेस हरकत वाटत नाही. तरी सदर कामातून मे. मॉर्डन सिक्युरटी सर्व्हिसेस यांना प्रति माह र.रु. २,९४,०००/- एवढे देयक देणेत यावे तसेच दि.०१/०२/२०२२ पासुन पुढे करारनामा ठेकेदाराने मे. मॉर्डन सिक्युरटी सर्व्हिसेस यांच्या बरोबर पवना थेट पाईप योजनेतील साहित्य सांभाळ्यासाठी करणेत यावा. तरी निविदा क्र.१६/१/२०२०-२१ ठेकेदार मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांच्या कामामध्ये पवना थेट पाईपलाईन योजनेच्या अंतर्गत येणारे साहित्य उदा. पाईप्स, व्हॉल्व्ह, पंप्स सांभाळण्यासाठी सिक्युरिटी सर्व्हिसेसचे देयक देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(दिनांक ०४/०३/२०२२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**



**(उल्हास बबनराव जगताप)**

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी- ४११०१८.

नगरसचिव कार्यालय

क्रमांक- नस/०४/कावि/७७/२०२२

दिनांक- २४/०२/२०२२ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.